# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

**बुधवार दिनांक ०१.०२.२००६ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिरडी येथील कार्यालयात मा.श्री शंकरराव गेणूजी कोल्हे, उपाध्यक्ष यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या सभेचे इतिवृत्त**

बुधवार दिनांक ०१.०२.२००६ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिरडी येथील कार्यालयात मा.श्री शंकरराव गेणूजी कोल्हे, उपाध्यक्ष यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयांवर झालेल्या निर्णयांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणेकामी सभा आयोजित करण्यात आली होती.

०१. निळवंडे धरणातून पाईप लाईन टाकून शिर्डी येथे पाणी आणणेबाबत

०२. शिर्डी शहर विकास आराखडयाकरीता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांची कन्सल्टंट म्हणून नेमणूक करणे बाबत.

०३. सुपर स्पेशालिटी नवीन रुग्णालयातील कार्डीओलॉजी,सी.टी.स्कॅन, डायलेसिस, कलर डॉपलर व सोनोग्राफी यात देण्यात यावयाच्या सवलतींबाबत.

०४. सोने-चांदी वस्तू अलंकारांचा टंच काढणे व खड्यांचे (Stones) मुल्यांकनासाठी मान्यताप्राप्त संस्थेची नेमणूक करणेबाबत.

०५. जुने रुग्णालय व प्रस्तावित नवीन रुग्णालय प्रकल्प अहवालाबाबत.

०६. सुपर स्पेशालिटी रुग्णालयातील प्रस्तावित कर्मचारी आकृतीबंध मान्यतेबाबत.

०७. घन कचरा संबंधी आलेल्या अर्जावर चर्चा करणे.

०८. श्री तुकाराम शंकरराव गोंदकर व श्री वसंत महादू गोंदकर यांचे जागेबाबत.

०९. संस्थान कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना देण्यात येणाऱ्या शैक्षणिक फी च्या परताव्याबाबत

या सभेस खालील सदस्य व संस्थानचे अधिकारी उपस्थित होते.

०१. मा.श्री जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष
०२. मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे,निमंत्रित
०३. मा.श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव, निमंत्रित
०४. मा.श्री भाऊसाहेब रा. वाकचौरे, कार्यकारी अधिकारी
०५. मा.श्री प्रकाश प्र.देशपांडे,प्रशासकीय अधिकारी
०६. मा.श्री सुभाष कि.जगताप, प्रशासकीय अधिकारी
०७. मा.श्री प्रकाश तु.जोशी, प्रशासकीय अधिकारी
०८. मा.श्री नानासाहेब ए.वाघ, प्रशासकीय अधिकारी
०९. मा.श्री रमेश शां.साबळे, प्रशासकीय अधिकारी

या सभेत खालील विषयांवर चर्चा होऊन शिफारसी करण्यात आल्या

## ०१. निळवंडे धरणातून पाईप लाईन टाकून शिर्डी येथे पाणी आणणेबाबत-

व्यवस्थापन समितीचे दिनांक २१.१०.२००४ चे सभेत निर्णय क्र. ५६ अन्वये निळवंडे धरणातून थेट पाईपलाईनव्दारे संस्थानला पाणी आणणेकामी मा.श्री जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष, मा.श्री शंकरराव गेणूजी कोल्हे,उपाध्यक्ष व मा.श्री राधाकृष्ण एकनाथ विखे पाटील या त्रिसदस्य समितीने चर्चा करुन आपला अहवाल व्यवस्थापन समितीस सादर करावा असे ठरले होते.

आजचे सभेत याबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्तबाबत सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेत यावा असे ठरले.

## ०२. शिर्डी शहर विकास आराखडयाकरीता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांची कन्सल्टंट म्हणून नेमणूक करणे बाबत.

व्यवस्थापन समितीचे दि.८.२.२००५ चे सभेत निर्णय क्र.६७ अन्वये शिर्डी शहर विकास आराखड्याकरिता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, यांची कन्सल्टंट म्हणून नेमणूक करणेबाबत मा.श्री.जयंत मुरलीधर ससाणे,अध्यक्ष,मा.श्री.शंकरराव गेणूजी कोल्हे,उपाध्यक्ष व मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांनी मा.श्री. अनिलकुमार लखीना, अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांची समक्ष भेट घेऊन चर्चा करावी असें ठरलें होते. दरम्यानच्या काळात मा.श्री.अनिलकुमार लखीना यांची बदली होऊन, त्यांचे जागी मा.श्री.रमानाथ झा यांची नियुक्ती झाली. त्यांचेशी संस्थानमार्फत शिर्डी शहर विकासबद्दल पत्रव्यवहार करण्यात आला. या पत्रांमध्ये शिर्डी शहरातील रस्त्याचें कडेला असलेल्या फुटपाथवर अतिक्रमणे होऊ नयेत

याकारिता कोणती उपाययोजना करावी याबद्दल कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही. याबाबत रस्ते विकास महामंडळ यांनी अद्याप कोणताही सल्ला संस्थानला दिलेला नाही.

यावर सविस्तर चर्चा होऊन,महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांना सुधारित पत्र पाठविण्यात येऊन त्यांची १५ दिवसांचे आत बैठक बोलविण्यात यावी. या बैठकीत त्यांना सदरहू काम करणार किंवा कसे याबाबत विचारणा करुन, कन्सल्टंट म्हणून काम करणार असल्यास तीन महिन्यांची मुदत देण्यात यावी असे ठरले.

**०३. सुपर स्पेशालिटी नवीन रुग्णालयातील कार्डीओलॉजी,सी.टी.स्कॅन, डायलेसिस, कलर डॉपलर व सोनोग्राफी यात देण्यात यावयाच्या सवलतींबाबत.**

व्यवस्थापन समितीचे दिनांक १७.०४.२००५ चे सभेत निर्णय क्र. १४८ अन्वये सुपर स्पेशालीटी रुग्णालयातील कार्डिओलॉजी, सिटी स्कॅन, डायलेसीस, कलर डॉपलर व सोनोग्राफी यात देण्यात यावयाच्या सवलींबाबत मा.श्री.शंकरराव गेणूजी कोल्हे,उपाध्यक्ष यांनी सूचविलेप्रमाणे योजना सहा महिन्यांकरिता प्रायोगिक तत्वार चालविण्यात यावी व त्यानंतर अंतिम निर्णय घेण्यात यावा,असा निर्णय झालेला आहे,त्याची नोंद घेण्यात आली.

**०४. सोने-चांदी वस्तू अलंकारांचा टंच काढणे व खड्यांचे (Stones) मुल्यांकनासाठी मान्यताप्राप्त संस्थेची नेमणूक करणेबाबत.**

व्यवस्थापन समितीचे दिनांक ३.५.२००५ चे सभेतील निर्णय क्र. १८१अन्वये मे.खरोटे ज्वलर्स मनमाड यांचे उपरोक्तप्रमाणे नियुक्तीस मान्यता देण्यात आली. तसेच सोने-चांदी वस्तू अलंकारांचा टंच पडताळणेसाठी श्रीरामपूर व कोपरगांव येथील आणखी मुल्यांकनकाराची नियुक्ती करण्यात यावी. मे.खरोटे यांनी पडताळणी केलेल्या सोने चांदी अलंकारांपैकी १० टक्के वस्तू अलंकाराच्या टंचाची पूनर्पडताळणी करणेसाठी या दुसऱ्या मुल्यांकनकाराची सेवा घेण्यात यावी व या इतर मुल्यांकनकाराचे नियुक्तीबाबत मा.अध्यक्ष व मा.उपाध्यक्ष यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे. तसेच खड्यांचे (Stones) मुल्यांकन मा.सदस्य श्री.के. सी. पाण्डेय व इतर एक स्थानिक सदस्याचे उपस्थितीत करण्यात यावे,असें ठरलें होते.

यावर सविस्तर चर्चा होऊन सोने-चांदी वस्तू अलंकाराचे टंच काढणे व खड्यांचे मूल्यांकनासाठी शासनाचे मान्यता प्राप्त संस्थानची यादी मागविण्यात येऊन, ती व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावी, असें ठरलें.

**०५. जुने रुग्णालय व प्रस्तावित नवीन रुग्णालय प्रकल्प अहवालाबाबत.**

व्यवस्थापन समितीचे दिनांक ९.७.२००५ चे सभेतील निर्णय क्र. २६३ अन्वये, सध्या सुरु असलेल्या (धर्मशाळेतील) रुग्णालयातील मेडिकल, सर्जिकल व आर्थोपेडिक या विभागातील ७० खाटा नुतनीकरण केलेल्या नवीन रुग्णालयात स्थलांतरीत करणेबाबत मा.श्री.शंकरराव गेणूजी कोल्हे, उपाध्यक्ष, मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.श्री.कैलास गोविंदराव कोते यांनी निर्णय घ्यावा, असें ठरलें होते. त्यानुसार सदरहू समितीची बैठक यथावकाश घेण्यात यावी, असें ठरलें.

**०६. सुपर स्पेशालिटी रुग्णालयातील प्रस्तावित कर्मचारी आकृतीबंध मान्यतेबाबत.**

व्यवस्थापन समितीचे दिनांक ६.८.२००५ चे सभेतील निर्णय क्र.३९८ अन्वये, सुपर स्पेशालिटी रुग्णालयासाठी तयार करण्यात आलेल्या कर्मचारी आकृतीबंधास व त्याकामी येणारे वार्षिक खर्चास मान्यता देण्यात आली. सदरचा आकृतीबंध शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावा असें ठरले होते.

सदरहू निर्णयानुसार सुपरस्पेशालिटी रुग्णालयासाठी तयार करण्यात आलेला कर्मचारी आकृतीबंध शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे. त्यास मान्यता मिळणेबाबत पाठपुरावा चालु आहे असे मा.कार्यकारी

अधिकारी यांनी सांगितले. यावर मा.शंकरराव गेणूजी कोल्हे,उपाध्यक्ष यांनी असे सांगितले की, याबाबत मा.कार्यकारी अधिकारी यांनी लवकरात लवकर पाठपुरावा करुन सदरहू प्रकरणाचा दोन महिन्यात निपटारा करावा.

**०७. घन कचरा संबंधी आलेल्या अर्जावर चर्चा करणे.**

व्यवस्थापन समितीचे दिनांक २.१०.२००५ चे सभेतील निर्णय क्र.५८९ अन्वये,मे.वसंतदादा शुगर इन्स्टीट्यूट यांना घन कचरा विल्हेवाट, सांडपाणी प्रक्रिया करणे यासंबधिच्या कामाचा प्रदीर्घ अनुभव असल्याने त्यांची नेमणूक करण्यात यावी अशी सूचना मा.शंकरराव गेणूजी कोल्हे,उपाध्यक्ष यांनी केली होती त्यास मान्यता देण्यात आली. त्यानुसार प्रशासनाने मे.वसंतदादा शूगर इन्स्टीट्यूट यांना दि.२७.१०.२००५ अन्वये नेमणूक आदेश दिलेला आहे. त्यानुसार मे.वसंतदादा शूगर इन्स्टीट्यूट यांचे प्रतिनिधींनी दि.८.११.२००५ रोजी शिर्डी येथे प्रत्यक्ष येऊन, दि.१४.११.२००५ रोजी श्रीसाईबाबा संस्थान व शिर्डी गाव असा एकत्रित घन कचरा विल्हेवाट, सांडपाणी प्रक्रिया याबाबतचा एकत्रित प्रस्ताव सादर केलेला आहे. यावर मा.शंकरराव गेणूजी कोल्हे,उपाध्यक्ष यांनी असे सांगितले की, श्रीसाईबाबा संस्थान व शिर्डी गाव असा एकत्रित प्रस्ताव न करता सध्या फक्त श्रीसाईबाबा संस्थानचा घन कचरा व सांडपाणी प्रक्रिया असा एकच प्रस्ताव त्यांना तयार करण्यास सांगण्यात यावे व या प्रकल्पासाठी त्यांची नेमणूक करण्यात येऊन,त्यांस व्यवस्थापन समितीची कार्योत्तर मान्यता घेण्यात यावी.

**०८. श्री तुकाराम शंकरराव गोंदकर व श्री वसंत महादू गोंदकर यांचे जागेबाबत.**

व्यवस्थापन समितीचे दिनांक २.१०.२००५ चे सभेतील निर्णय क्र.६४४ अन्वये श्री तुकाराम शंकरराव गोंदकर यांची समाधी मंदिराजवळ असलेली जागा व श्री.वसंत महादू गोंदकर यांची संस्थानचे कनकुरी साठवण तलावा-जवळील जागेबाबत त्यांचेशी समक्ष चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेण्याचे अधिकार मा.अध्यक्ष व मा.उपाध्यक्ष यांना प्रदान करणेत आले होते.

त्यानुसार मा.श्री शंकरराव गेणूजी कोल्हे, उपाध्यक्ष यांनी संबधितांशी समक्ष चर्चा करुन सदरहू अर्जदाराची विनंती नामंजूर करण्यात यावी असे ठरले.

**०९. संस्थान कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना देण्यात येणाऱ्या शैक्षणिक फी च्या परताव्याबाबत.**

व्यवस्थापन समितीचे दिनांक २.१०.२००५ चे सभेतील निर्णय क्र.६४५ अन्वये संस्थान कर्मचाऱ्यांचे पाल्यांना देण्यात येणाऱ्या फी परताव्याबाबत सुधरित नियमावली तयार करणेची जबाबदारी मा.श्री जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष व मा.श्री शंकरराव गेणूजी कोल्हे, उपाध्यक्ष यांनी स्वीकारली. सुधारित नियमावली तयार झालेवर ती व्यवस्थापन समितीचे सभेपूढे मान्यतेसाठी सादर करावी असे ठरले.

आजचे सभेत सविस्तर चर्चा होऊन संस्थान कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना देण्यात येणाऱ्या शैक्षणिक फीच्या परताव्याबाबत श्री जाधव, एक्स लेबर कमिशनर, औरंगाबाद यांचा सल्ला घेण्यात यावा असे ठरले.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

(भाऊसाहेब रा.वाकचौरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती,शिर्डी

(शंकरराव गेणूजी कोल्हे)
उपाध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती,शिर्डी